# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २२/९/२००८ रोजी झालेल्या (दि.१९/९/२००८ रोजीची तहकूब सभा) स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त

**सोमवार,** दिनांक **२२ सप्टेंबर २००८ रोजी** (दि.१९/९/२००८ रोजीची तहकूब सभा) स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "**मलीक अंबर स्थायी समिती सभागृह**" येथे **दुपारी १२-१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.), नगर सचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. जावेद हसन खान
६. श्री. वसंत नरवडे पाटील
७. सौ. अल्पा विकास जैन
८. श्री. संजय जोशी
९. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
१०. श्री. रविकांत गवळी
११. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१२. श्री. कचरू सोनवणे
१३. श्री. सिताराम सुरे
१४. श्री. नारायण कुचे

**विषय क्र. ७९ :** (दि.१९/९/२००८ रोजीच्या बैठकीत ठरल्यानुसार......)

दिनांक **१/०७/२००८** (का.प.क्र.८), **८/०७/२००८** (का.प.क्र.९), **१६/०७/२००८** (का.प.क्र.१०), **२४/०७/२००८** (का.प.क्र.११), **३०/०७/२००८** (का.प.क्र.१२),रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : विषय क्र. ८६ मधे चौकशी अधिकारी सहाय्यक म्हणून अयुब खान यांच्याकडे जबाबदारी सोपविली होती परंतु त्या काळात सहा.आयुक्त म्हणुन अयुब खान हे होते त्या कारणाने त्यांच्याऐवजी इतर अधिकाऱ्यांचे नाव देण्यात यावे.

मा.सभापती : विषय क्र. ८६ मधे चौकशी अधिकारी मुख्यलेखापरिक्षक यांचे सहाय्यक म्हणून श्री.अय्युब खान यांचे नाव कमी करून त्यांच्या ऐवजी श्री.जरारे वॉर्ड ई अधिकारी यांची नेमणूक करण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : आपण पाच इतिवृत्त मंजूर केले आहे. स्थायी समितीची बैठक ५० दिवसानंतर लावण्यात आलेली आहे. इतिवृत्त मंजूर करतांना काही गोष्टींचा खुलासा होणे गरजेचे आहे. इविवृत्त दिनांक ०१.०७.२००८ पान क्रं.२१ मध्ये संत एकनाथ रंगमंदीरच्या पार्कीग बाबत आपण सुचना केली होती व प्रशासनाने सांगीतले होते की, ७ दिवसात पार्कींगची जागा ताब्यात घेवू, त्याबाबत माहिती द्यावी.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.विष्णु वझे : संत एकनाथच्या बाजुला जी पार्कींग आहे त्याची पाहणी मा.सभापती आणि स.सदस्यांनी स्वतः केली. त्याठिकाणी बेसमेंटची जागा आहे त्यात ड्रेनेजचे पाणी गेलेले आहे आणि ते त्यांना क्लिन करायला सांगीतले आहे. कंप्लीशेनसाठी फाईल सबमिट केलेली आहे.

श्री.रविकांत गवळी : पार्कींगची जागा हस्तांतर केली आहे काय?

श्री.विष्णु वझे : त्याबाबतीत आम्ही शहर अभियंता यांना पत्र दिले आहे की, मनपाच्या देखरेखीखाली ते बांधकाम करावयाचे होते.

श्री.रविकांत गवळी :शहर अभियंता कोण आहेत.

श्री.सतिष कटकटे : शहर अभियंताचे नाव सांगण्यात यावे.

उपआयुक्त(म) : कुठल्या विभागाच्या इनवर्डमध्ये पत्र दिले आहे.

श्री.सतिष कटकटे : आपण दिशाभूल करत आहे तसेच शहर अभियंता यांना जे पत्र दिले आहे त्याची कॉपी आम्हाला देण्यात यावी.

मा.सभापती :पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : इतिवृत्त दि.०८.०७.२००८ रोजीच्या कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात आले होते. ती यादी सादर करण्याचे आदेश देण्यात आले होती ती अद्यापपर्यंत आलेली नाही. क्रांतीचौक येथील सर्व्हे नं ५४, शहानुरवाडीतील सर्व्हे नं.८ आणि १५ मधे ८० फुटाचा नाला होता त्या नाल्याची सध्या १० फुटाची नाली झालेली आहे. त्याबाबतीत अद्याप कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती : सर्व्हे नं ८ आणि ५४ बाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.विष्णु वझे : पुढील बैठकीत सदर प्रकरणाचा अहवाल सादर करतो.

मा.सभापती : प्रशासनाने पुढील बैठकीत खुलासा सादर करण्यात यावा.

श्री.वसंत नरवडे :ऐनवेळच्या जो विषय आलेला आहे त्यास मंजूरी दिलेली आहे. मा.आयुक्तांचे प्रत्येक वॉर्डात १० लाखाचे कामाची मर्यादा असतांना आपण १६ लाखाच्या कामांना मंजूरी देत आहात. पदाधिकाऱ्यांनीच सर्व कामे करायचे व नगरसेवकांची कामे कसे होतील.

श्री.संजय जोशी : गुरूतागद्दी कार्यक्रमासाठी १ कोटी विकास कामासाठी मंजूर केलेले आहे. एकाच मिटींगमधे इस्टीमेटला मंजूरी आणि त्याच मिटींगमधे टेंडर पण ही कामकाजाची पध्दत नाही. सदर प्रस्तावात असे लिहिले पाहिजे होते की, कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करीत आहोत.

अति.शहर अभियंता : उस्मानपुऱ्यातील दोन जे कामे आहेत ति वेगवेगळी आहेत. एक काम आहे एक्सीसटींग रस्त्याला डांबरीकरण करणे व दुसरे म्हणजे रस्त्याच्या बाजूला जे

अतिक्रमण काढले आहे तेथे रस्त्याचे रुंदिकरणाचे काम. अशी दोन वेगवेगळी कामे आहेत.

श्री.संजय जोशी : उस्मापुरा चौक ते तारा पानसेंटर रस्त्याचे डांबरीकरण करणे. म्हणजे टेंडर मंजुरी आणि इस्टीमेटला मंजूरी आली आहे.

मा.सभापती : आपली मिटींग ५० दिवसानंतर झाल्यामुळे हा गोंधळ झाला आहे.

श्री.रविकांत गवळी : इतिवृत्त आणि एजन्सी दोन्ही मिटींगमधे येणे हरकत नाही. परंतु कामाची एमरजन्सी असल्यामुळे आम्ही कार्यात्तर मंजूरी देत आहोत असा उल्लेख करणे गरजेचे होते.

श्री.संजय जोशी : अश्या चुका होता कामा नये.

मा.सभापती : प्रशासनाने दखल घ्येण्यात यावी अशी चुक होत कामा नये.

श्री.वसंत नरवडे : महाराष्ट्र शासनाने गुरूता गद्दी करीता निधी दिला आहे. त्यातुन आपण औरंगाबादकरीता १०० कोटी रूपये वळती करून ठराव करून पाठवावा अशी विनंती आहे.

श्री.संजय जोशी : आपल्या येथिल गुरूद्वारालाही ऐतिहासिक महत्व आहे. धावणी मोहल्ला येथील गुरूद्वारा जुणं आहे तेथेही भावीक येणार आहे, त्यामुळे मा.मुख्यमंत्र्याना निधी करीता विनंती करा.

श्री.वसंत नरवडे : ठराव मंजूर करून मा.मुख्यमंत्र्याना व मा.विभागीय आयुक्तांना कॉपी देण्यात यावी. मा.विभागीय आयुक्तांना महानगरपालिकेची परिस्थिती माहिती आहे त्यामुळे ते औरंगाबादला निधी मिळण्यासाठी मदत करतील. ह्या निमीत्ताने औरंगाबादचा विकास होईल.

मा.सभापती :सर्व सदस्यांची भावना लक्षात घेवून गुरूगोविंदसिंगजी यांचे जन्माचे त्रिशताब्दी निमित्त गुरूतागद्दी कार्यक्रमाची सुरूवात होत आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने यासाठी मनपा फंडातुन १ कोटी रूपये दिलेले आहे आणि स्थायी समितीचे सर्व सदस्य या प्रकरणी एक निवेदन तयार करून मा.विभागीय आयुक्त यांना सोबत घेवून मा.मुख्यमंत्री यांची भेट घेवून यासाठी आणखी काय निधी मिळवता येईल यासाठी प्रयत्न करू.

श्री.दत्ताभाऊपाथ्रीकर: केंद्र सरकारने एक कमिटी नेमली आहे या कमिटीचे अध्यक्ष मा.शिवराज पाटील चाकूरकर आहेत. आपण त्या कमिटीकडे रिप्रेझेंटेशन करू. मा.विभागीय आयुक्तांना सोबत घेवून निधी मिळविण्याचा प्रयत्न करू.

श्री.वसंत नरवडे : सदरचा प्रस्ताव ताबडतोब मा.मुख्यमंत्र्याकडे पाठवावा. नंतर भेटण्याकरीता जावे.

मा.सभापती :सर्व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे हा बाब मंजूर करण्यात येवून मा.मुख्यंमत्र्यांची भेट घेवू.

श्री.कचरू मोरे : वापरण्याच्या पाण्यात अबेट औषध गेल्या दिड महिण्यापासून आरोग्य विभागाने टाकलेले नाही.संस्थेचे प्रस्ताव आरोग्य विभागात प्रलंबीत आहे ते निकाली काढण्यात यावे व अतिक्रमण मोहिम राबवितांना ज्या ठिकाणी अतिक्रमण काढण्यात आलेले आहे ते उचलण्याचे काम डांबर कॉन्ट्रॅक्टर कडून करून घेत आहोत त्या खाजगी संस्थेला दर महिण्याला ४.५० लाख रूपये खर्च

होत आहे. ते काम आपल्या कर्मचाऱ्यांना ओव्हर टाईम देवून करून घेण्यात यावे.

श्री.वसंत नरवडे : शहरात गॅस्ट्रोची व ईतर रोगाची साथ आली आहे. याबाबत महानगरपालिकेने कुठल्या उपाययोजना केलेल्या आहे.

आरोग्य वै.अधिकारी :गेल्या आठवडयात मनपा हद्दीतील १४ रूग्ण आहेत, इतर बाहेरचे आहेत. पैकी १ महानगरपालिका हद्दीतील व ४ बाहेरील डिटेक्ट झालेले आहेत. यासाठी दोन महिण्यांपूर्वीच उपाययोजना आखण्यात आलेल्या आहे. २५ पाण्याचे नमुने आमच्या सेंटरवर घेण्यात आलेले आहे. त्याचा अहवाल जर दुषित आला तर लगेच वॉटर वर्क विभागाला कळविण्यात येतो.

श्री.वसंत नरवडे :किती रिर्पाट दुषित आलेले आहे.

आरोग्य वै.अधिकारी :ऑगष्ट महिण्यात २२२ पाण्याचे नमुणे घेण्यात आलेले आहे त्यातील ०३ नमुणे दुषित आलेले आहे आणि हयाबाबतीत वॉटर वर्क विभागाला कळविण्यात आलेले आहे.

श्री.वसंत नरवडे :आजही माझ्या वॉर्डात दुषित पाणी येते. अबेट औषध, नोऑन व बी.एच.सी. पावडरचा तुटवडा आहे.

श्री.नारायण कुचे : शहरात फॉगींग मशीन किती आहेत व चालू स्थितीत किती आहेत.

आरोग्य वै.अधिकारी : महानगरपालिकेकडे फॉगींग मशीन ३२ आहेत व चालू स्थितीत २८ मशीन आहेत.

श्री.वसंत नरवडे :ज्या ठिकाणी कचराडेपो आहे त्या ठिकाणी बी.एस.सी पावडरची फवारणी केली जात नाही औरंगपूरा सारख्या मध्यवर्ती ठिकाणी उघडयावर कचरा टाकल्या जातो. तेथे बी.एच.सी. पावडरची फवारणी करण्यात आलेली नाही त्या ठिकाणी डासांचा प्रार्दुभाव वाढलेला आहे.

आरोग्य वै.अधिकारी :बी.एच.सी.पावडर आणि नोऑनची खरेदी भांडार विभागामार्फत होते, सध्या बी.एच.सी.पावडर आणि नोऑन उपलब्ध आहे. वॉर्ड ऑफिसरला ते पुरविण्यात आलेले आहे ते फवारणी करून घेणे आवश्यक आहे व काही ठिकाणी फवारणी चालू आहे.

कार्य.अभि.(पा.पु.) : स.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे त्या ठिकाणी वैयक्तिकरित्या जावून पाहणी करून योग्य ती काळजी घेतली जाईल.

मा.सभापती :आरोग्याविषयी आरोग्य वै.अधिकारी यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.

कार्य.अभि. (पा.पु.) :ऑगष्ट २००८ रोजी पाण्याचे २२२ सॅम्पल घेण्यात आलेले आहे त्यातीत ०३ नमुणे दुषित आढळून आले आहे. आरोग्य विभागातून पिण्यास अयोग्य असलेल्या पाण्याची यादी आल्यानंतर ज्या ०३ ठिकाणी (कंन्टमनेशन झाल्यामुळे) दुषित पाणी येत होते तो प्रश्न दुर करण्यात आलेला आहे.

श्री.वसंत नरवडे : मनपाला पाणी जायकवाडी वरून येते, ज्या ठिकाणी कंन्टमनेशन सापडले आहे त्या ०३ ठिकाणचे नाव सांगण्यात यावी.

कार्य.अभि. (पा.पु :सध्या यादी उपलब्ध नाही.

मा.सभापती :पुढील बैठकीमधे नावे देण्यात यावी.

श्री.कचरू मोरे :विषय क्रं.७९ ,दिनांक ०८.०७.२००८ च्या पान क्रं १५ वर पेव्हर ब्लॉकच्या संदर्भात चौकशी अहवालावर असे सूचित केले होते की, टेक्निकल प्रश्नासाठी

आय.आय.टी.मुंबई यांचा अहवाल मागविण्यात आला होता तो आला आहे काय?

मा.सभापती :सदरचा अहवाल आय.आय.टी, मुंबईकडे पाठविण्यात आलेला आहे, त्यांचा रिपोर्ट अजून पर्यंत प्राप्त झालेला नाही.

श्री.कचरू मोरे :आझाद चौकातील पेव्हर ब्लॉकचा रॅम्प उंच केलेला आहे व तो तुटलेला आहे.

अति.शहर अभियंता :पंचवटी चौक व आझाद चौकात पेव्हर ब्लॉक बसविलेले आहे , अजून रॅम्पचे काम पूर्णपणे झालेले नाही काम बाकी आहे.

श्री.रविकांत गवळी :विषय क्रं.७९ मधे पाच इतिवृत्त मंजूरी करीता आलेले आहे त्यात जे मुद्दे काढलेले आहे क्रांतिचौकातील सर्व्हे नं ५४ गारखेडा, सर्व्हे नं १५ जाफरगेट येथिल अहवाल हे सर्व विषय पुढील बैठकीमधे माहिती देण्यात यावी. अतिक्रमण विभागासाठी चार ईमारत निरीक्षक नियुक्ती संदर्भात कारवाई झालेली आहे काय? जाफरगेटचा अहवाल प्राप्त आहे का.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती सादर करण्यात येईल. स्पेक व जाफरगेटचा अहवाल प्राप्त आहे.

श्री.अ.रशिद मामु : कटकट गेट येथील नळ कनेक्शन कापण्यात आले ते का कापण्यात आले?

कार्य.अभियंता : मुख्य जलवाहिनी वरती नळ कनेक्शन घेण्यात आल्यामुळे ते कापण्यात आले.

श्री.अ.रशिद मामु : जालना रोडवर सर्व पुढारी आहेत त्यांच्याकडे दोन दोन नळ कनेक्शन आहेत ते का काढण्यात येत नाही.

कार्य.अभियंता :मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशान्वये सहा वॉर्ड इंजिनिअरच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण शहराचे आपण अनाधिकृत नळ आणि व्यावसायिक नळ नियमित करण्यासाठी पथक नेमलेले आहे त्याचा परिणाम लवकरच दिसेल.

श्री.सतिष कटकटे : वर्तमानपत्रात मेन लाईनवरती नळ कनेक्शनची बातमी आल्यामुळे मा.आयुक्तांनी नळ कट करण्याचे आदेश दिले.

श्री.अ.रशिद मामु : जालना रोडवर आपण गेल्यावर आपणावर दबाव आला त्याकारणाने आपण कारवाई केली नाही.

श्री.संजय जोशी : प्रशासनाने पथकात अजून दोन दोन माणस/कर्मचारी वाढवून दिली पाहिजे.

श्री.अ.रशिद मामु : प्रशासनाचा खुलासा आपण का देता? कटकट गेट ते सिडको ६ पथके नेमली. ५ पथके झोपले आहेत का, गरीब लोकांचे नळ कापले. जालना रोडवर हॉटेल्सवाल्यांनी १ इंची-२ इंची व्यासाचे अनधिकृत नळ घेतलेले आहेत. कटकट गेट येथे ४ दिवसांत कार्यवाही केली. इतर ठिकाणी का केली नाही. ज्या प्रमाणे कटकटगेट येथील नळ कट केले त्याप्रमाणे कलेक्ट्रर ऑफिस ते सिडको पर्यंत इतर वॉर्डात अनाधिकृत नळाबाबतची मोहिम राबविण्यात यावी. JCB लावून काढा.

श्री.जावेद हसनखान : कटकट गेट भागात कार्यवाही केली. दुसरीकडे का केली नाही.

मा.सभापती : स.सर्व सदस्यांची एकच भावना आहे की, कटकटगेट येथे जशी मोहिम राबविण्यात आली त्याच प्रकारे शहरातील सर्व ठिकाणी सर्व मेन रोड, मेन लाईनवर अनाधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करून आठ दिवसात अहवाल स्थायी समितीस द्यावी.

श्री.अ.रशिद मामू : रेल्वेस्टेशन येथील उड्डाणपुल व टाउन सेंटर येथील उड्डाणपुलाच्या बाजुला रस्ता अतिशय खराब अवस्थेत आहे. मंत्रिमंडाळाच्या बैठकीसाठी मेन रस्ते डांबरीकरण करण्यात आले परंतु मेनरोड सोडून इतर रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. तेथे गरीब लोक जातात तेथे कले नाही.

श्री.संजय जोशी : ज्या रस्त्यावरून मंत्री जाण्याची शकयता होती तिथे फक्त खडीकरण करण्यात आले व ज्या मेन रस्त्यावरून मंत्री जाणारच होते तिथे डांबरीकरण करण्यात आले आणि जिथे मंत्री जाणारच नव्हते तिथे खड्डेच खड्डे पडलेले आहे.

श्री.कचरू मोरे : जेथे माणसं जात नाहीत तेथे फुटपाथ केलेत.

अति.शहर अभियंता : स.सदस्य यांनी जो टाउन हॉल उड्डाणपुलाचा विषय काढला उड्डाणपुलाच्या खाली ड्रेनेज बदलण्याचे काम झाले त्यामुळे खड्डे पडले आहे. ते काम करण्यासाठी निवीदा काढण्यात आली आहे पाउस थोडा थांबला म्हणजे तेथील काम हाती घेण्यात येईल. तसेच रेल्वेस्टेशन येथील उड्डाणपुलाच्या बाजूच्या रस्त्यावर मागील काही वर्षात १४०० ते ७०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे लिकेज काढण्यात आले आहे. त्यामुळे तो खराब झाला आहे. रस्ता पुर्णबांधणी शिवाय पर्याय नाही. सध्या अंदाजपत्रकात त्याची तरतुद नाही तरीही त्याबाबतीत अंदाजपत्रक तयार करून ठेवलेले आहे.

श्रीमती मोमीन सफिया :२०.०९.२००८ रोजी शनिवारी गुंठेवारी बाबत जी माहिती दिली आहे, ६०० पैकी ३०० जणांनी गुंठेवारी टॅक्स भरलेले आहे. गुंठेवारी चालान भरलेले आहे त्याची झेरॉक्स करून त्याचा रेकॉर्ड करण्यात यावा. ज्यांनी गुंठेवारी टॅक्स भरलेला नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : प्रशासनाशी चर्चा झाली आहे कारवाई करण्यात येईल.

श्रीमती मोमीन सफिया : रमजान उल मुबारकला शहागंज येथे बसस्टॅंड आणि त्यासमोरील भागात मागील काही वर्षापासुन मिना बाजार भरला जात आहे. दर वर्षी ज्या कमिटीला मिना बाजार भरविण्याची परवानगी देण्यात येते हयावर्षीही त्या कमिटीला परवानगी देण्यात यावी.

मा.सभापती : मिना बाजार बाबत महानगरपालिकेची काहि रक्कम बाकी आहे ति रक्कम भरल्यानंतर परवानगी बाबत विचार करण्यात येईल, परवानगी देण्यात येईल.

श्रीमती मोमीन सफिया : अमिन कॉम्पलेक्स, सिल्क मिल कॉलनी येथील अतिक्रमण हटविण्याबाबत आपण वारंवार सांगीतले आहे परंतु आज पर्यंत अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही. सिल्कमील कॉलनी येथील अमीन कॉम्प्लेक्स समोर अतिक्रमण आहे ते काढण्यात यावे.

मा.सभापती : कार्यवाही करण्यात येईल.

सौ. अल्पा जैन :दिनांक ०८.०७.२००८ च्या इतिवृत्तात पान क्र १२ वर उर्दु शिक्षिकेबाबत प्रश्न मांडण्यात आला होता तो आजपर्यंत सोडवण्यात आलेला नाही.

उपआयुक्त (प्र) :आठ दिवसात उर्दु शिक्षीका उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :शिक्षण विषयावर एक बैठक आयोजित करण्यात यावी. सिडकोमधे क्रिडांगणे आहे, एन ३ मधे टेनिस क्रिडांगण आहे, कम्युनिटी सेंटर बाबत काय ठरविलेले आहे त्याची सविस्तर माहिती तसेच शाळेमधे शिक्षक देण्यासंदर्भात तात्पुरत्या स्वरूपात का असेना शिक्षक उपलब्ध करून द्या.

उपआयुक्त (प्र) :याबाबतीत सविस्तर कारवाई झालेली आहे आठ दिवसात प्रश्न निकाली लागेल.

मा.सभापती :विषय क्रमांक७९ मंजूर करण्यात येतो.

श्री.संजय जोशी : दिनांक १/७/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.५४ अन्वये शहागंज भाजी मंडईतील मनपाकडे नियमित भाडे भरणा केलेले ७ स्टॉल धारकांना पर्यायी जागा देण्यात आली. याच ठिकाणचे दुकान क्र.११४ चे गाळेधारक अ. करीम गुलाम यांचे दुकानाचे मार्च २००८ पर्यंतचे भाडे भरणा केलेले आहे. अ.करीम गुलाम यांचे निधन झालेले असल्याने, त्यांचे पत्नीचे विनंतीनुसार त्यांचे दीर श्री.मोहम्मद इब्राहीम मो.युसुफ मेमन यांना दुकान क्र. ११४ ऐवजी दुकानासाठी जागा देण्यात यावी.

मा. सभापती : श्री.मोहम्मद इब्राहीम मो.युसुफ मेमन यांनी दुकान क्र.११४ चे भाडे २००८ पर्यंत नियमित भरणा केलेले असल्याने त्यांना दुकानासाठी जागा देण्यात यावी. या दुरूस्तीसह स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

दिनांक १/७/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये पारीत झालेल्या ठराव क्र. ५४ मध्ये श्री.मोहम्मद इब्राहीम मो.युसुफ मेमन यांनी दुकान क्र. ११४ चे भाडे २००८ पर्यंत भरणा केलेले असल्याने त्यांना जागा देण्यात यावी अशी दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

या व इतर दुरूस्तीसह **१/०७/२००८, ८/०७/२००८, १६/०७/२००८, २४/०७/२००८** व **३०/०७/२००८**रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. ८७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गुरूता गद्दी सन २००८ साठी सिंधी कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००७-०८ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१२,४७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करण्यास्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षांतर्गत गुरूता गद्दी सन २००८-०९ च्या आर्थिक तरतुदी अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रू.१२,४७,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरूता गद्दी सन २००८ साठी सिंधी कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,४७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८८ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, उस्मानपुरा चौक ते तारा पान सेंटर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१५,००,.००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनःर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षातुन करण्यात येत आहे.

सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.१५,००,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा चौक ते तारा पान सेंटर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्रीमती जयश्री रोहीदास तरटे, सहशिक्षिका, कें.प्रा.शाळा बायजीपुरा, मनपा औरंगाबाद यांना मुत्रपिंड रोपणाची शस्त्रक्रिया (Kidny Transplant Operation) करण्यासाठी अग्रीम रक्कम रू.३,४५,०००/-(रूपये तीन लाख पंचेचाळीस हजार फक्त) वैद्यकीय अग्रीम मंजूर करणे आहे. याबाबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, औरंगाबाद यांनी सदरील खर्च प्रमाणीत करून या संदर्भाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. संबंधीताची मुत्रपिंडरोपणाची शस्त्रक्रिया करणे जरूरी आहे. सदरील शस्त्रक्रिया कमलनयन बजाज रूग्णालय औरंगाबाद येथे होणार असून महानगरपालिकेतर्फे वैद्यकीय अग्रीम रक्कम रू. ३,४५,०००/-(रूपये तीन लाख पंचेचाळीस हजार फक्त) मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती जयश्री रोहीदास तरटे, सहशिक्षिका, कें.प्रा.शाळा बायजीपुरा, मनपा औरंगाबाद यांना मुत्रपिंड रोपणाची शस्त्रक्रिया (Kidny Transplant Operation) करण्यासाठी महानगरपालिकेकडून अग्रीम रक्कम रू.३,४५,०००/-(रूपये तीन लाख पंचेचाळीस हजार फक्त) वैद्यकीय अग्रीम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता तथा प्रभारी वॉर्ड अभियंता-अ यांनी दि.१/३/२००७ रोजी महानगरपालिका कार्यालय प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ मधील आपल्या कॅबीनमध्ये रू.५०००/- ची लाच स्विकारल्यामुळे, त्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/३२२, दि.६/३/२००७ अन्वये निलंबीत करण्यात आले होते.

पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र.सीआर/७४/औ'बाद/०७/१८४ दिनांक १७/१/२००८ अन्वये श्री.भागाजी पाराजी सोनवणे, यांचेविरूध्द दाखल सापळयाच्या गुन्हा संदर्भाने न्यायालयात अभियोग दाखल करण्याची मंजुरी मागितली होती. तथापी अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यापुर्वी श्री.भागाजी पाराजी सानवणे, यांची दि.२६/६/२००८ रोजी समक्ष सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीत संबंधीत कर्मचाऱ्यास सदर प्रकरणात हेतुपुस्कर गुंतविण्यात आल्याचे प्रशासनाचे स्पष्ट मत झाल्याने, अपचारी कर्मचाऱ्याविरूध्द अभियोग दाखल करण्याची परवानगी नाकारण्यात आली व तसे ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांना कळविण्यात आले. तथापी संबंधीत कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे कलम ४(५) (क) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून संबंधिताचे निलंबन आदेश रद्द करून सेवेत पुन:र्स्थापित करण्यात आले आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता यांचेवरील सापळयाच्या गुन्हा संदर्भाने या प्रकरणात त्यांना हेतुपुरस्कर गुंतविण्यात आल्याचे प्रशासनाचे स्पष्ट मत झाल्याने, अपचारी कर्मचाऱ्याविरूध्द अभियोग दाखल करण्याची परवानगी नाकारण्यात आली असल्याने संबंधीत कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे कलम ४(५) (क) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून संबंधिताचे निलंबन आदेश रद्द करून सेवेत पुन:स्थापित करण्यात आले, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ गांधीनगर ह्या घोषीत झोपडपट्टी मध्ये स्थानिक नागरीकांनी लोकवर्गणीच्या माध्यमातून समाज मंदीर स्वरूप वापरा करीता अर्धवट विकासीत केलेले/बांधकाम झालेले आहे. त्यामध्ये साधारणपणे तळ मजल्याचे RCC frame work व काही विट बांधकाम झालेले आहे. दरवाजे, खिडक्या बसविणे, बांधकाम करून Plastering करणे इत्यादीसह Finishing ची कामे निधी अभावी अर्धवट आहेत/झालेले नाही. अर्धवट कामामुळे स्थानिक नागरीकांना समाज मंदीराची सुविधा उपलब्ध होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. घोषीत झोपडपट्टी मध्ये नागरीकांचे राहणीमान/दर्जा पाहता नागरीकांना लहान मोठ्या घगुती सामाजिक कार्यक्रमा करीता या वसाहतीत समाज मंदीरा सारखी सुविधा असणे गरजेचे आहे. ह्या संबंधाने स.सदस्यांनी नागरीकांच्या मागणीचा विचार करून सदर बांधकाम महानगरपालिकेने पूर्ण करून नागरीकांना समाज मंदीराची सुविधा उपलब्ध करून द्यावी म्हणून प्रस्तावित केले आहे.

सदर मागणी व या भागात महानगरपालिकेकडून अशी सुविधा उपलब्ध करून द्यावयाची झाल्यास जागेची उपलब्धता तपासून जागा संपादन करून नव्याने बांधकाम करणे इत्यादी सोपस्कारामध्ये प्रथम जागा उपलब्धतेस या भागात असणारी अडचण इत्यादी विविध मुद्दे विचारात घेता या ठिकाणी वर नमुद केलेले अर्धवट स्थितीतील समाज मंदीर वापरा स्वरूपाचे बांधकाम पूर्ण करून महानगरपालिकेने एक सुविधा विकसीत करून नागरीकांना सुविधा पुरविणे योग्य वाटते व स्थानिक नागरीकांनाही ते अपेक्षित आहे.

मात्र महानगरपालिके कडून कोणत्याही ठिकाणी काही बांधकाम अथवा बांधकामावर खर्च करावयाचा झाल्यास ती मिळकत महानगरपालिकेचे ताब्यात असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात/महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्याशिवाय सदर ठिकाणी कोणतेही काम/खर्च महानगरपालिके कडून करता येणार नाही. ह्या मुद्या संबंधाने असे प्रस्तावित करण्यात येते की, सदर अर्धवट बांधकाम झालेली मिळकत जागेसह महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर तेथे महानगरपालिकेकडून विकास करणे शक्य होणार असल्याने संबंधीत स्थानिक नागरीक/त्यांचे प्रतिनिधी मंडळ यांचेकडून प्रथम सदर जागा रितसर महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याच्या व महानगरपालिकेच्या ताब्यात, महानगरपालिकेस हस्तांतरणाचे कार्यवाही नंतर सदर मिळकत समाज मंदीर म्हणून विकसीत करण्याचे काम करण्यात यावे या करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सदर प्रस्ताव मान्यतेनंतर जागा ताब्यात घेण्याची/हस्तांतरणाची कार्यवाही करून घेऊन नंतरच अर्थसंकल्प सन २००८-०९ चे तरतुदी संबंधाने निधी उपलब्धते नुसार सदर मिळकतीचे उर्वरीत बांधकाम करून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल व घोषीत झोपडपट्टी मधील नागरीकांना या माध्यमातून एक सुविधा उपलब्ध होईल. प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३८ गांधीनगर ह्या घोषीत झोपडपट्टी मध्ये स्थानिक नागरीकांनी लोकवर्गणीच्या माध्यमातून समाज मंदीर स्वरूप वापरा करीता अर्धवट विकसीत केलेले/बांधकाम झालेले असल्यामुळे, सदर बांधकाम महानगरपालिकेने पूर्ण करून नागरीकांना समाज मंदीराची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अर्धवट बांधकाम झालेली मिळकत जागेसह महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर हस्तांतरणाचे कार्यवाही नंतर सदर मिळकत समाज मंदीर म्हणून विकसीत करण्याचे उर्वरीत काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२ :**

औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद दरमहा मानधन रू.५,०००/- व ११ महिन्याच्या करार पध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीसाठी जाहिरात देण्यात आली.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने दि.४.१२.२००७ रोजी एकूण २० उमेदवारांच्या तोंडी मुलाखत घेतली. गुणवत्तेनुसार उत्कृष्ट ठरलेले श्री.सावरे कोंडीराम शेषराव यांची मानद समन्वयक पदी मा.स्थायी समिती ठराव क्र.३९१ दि.२८.२.२००८ नुसार नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी दि. २१ एप्रिल २००८ रोजी राजीनामा दिलेला आहे. त्यामुळे रिक्त झालेल्या पदी गुणानुक्रमे दुसऱ्या क्रमांकावर असलेले श्री.विनायक देवराव येवते यांची मानद समन्वयक म्हणून नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.वसंत नरवडे पा. : पहिल्या उमेदवारास नियुक्ती दिली होती का.

श्री.संजय जोशी : प्रथम उमेदवारी नियुक्ती केल्यावर गुणाक्रमानुसार १ ते ३ क्रमांक देण्यात आले, पहिल्याने राजीनामा दिला असेल व दुसऱ्या क्रमांकाच्या उमेदवार घेत असेल तर मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : त्यांनी काम केले. नियुक्तीच्या वेळी प्रतिक्षा यादी तयार केली होती.

मा.सभापती : विषय क्रं.९२ मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे रिक्त झालेल्या पदावर, गुणानुक्रमे दुसऱ्या क्रमांकावर असलेले श्री.विनायक देवराव येवते यांची मानद समन्वयक म्हणून दरमहा मानधन रू.५,०००/- व ११ महिन्याच्या करार पध्दतीने नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.२९ अंतर्गत एस.टी. कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१०,००,०००/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविले असता एकूण तीन निविदा विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा २९.८६% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३०.१५% जास्त दराने |
| ३. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३४% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी एम. ए. सिद्यीकी यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.८६% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता १९% जास्त दर येत आहे. त्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.११,८०,०००/- एवढा खर्च होणार आहे. यास मा. आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी एम. ए. सिद्यीकी यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२९ अंतर्गत एस.टी. कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक एम.ए.सिद्यीकी यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.१७, एन-९, सिडको, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौ. सोसा., उल्का हौ. सोसा., चंद्रनगर हौ.सोसा. येथील नाल्यास संरक्षीत भिंत बांधून नाला चॅनलींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां./म.जी.प्रा. दरसूची सन २००७-२००८ नुसार तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रक रक्कम रू.२४,७९,०००/- आहे. सदर अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.१६-२-२००८ ठराव क्र.१४१ दिनांक ३१-१-२००८ अन्वये वळती केलेली रक्कम रू.१४.८० लक्ष आणि विशेष शासकीय अनुदानातून रक्कम रू.१०.०० लक्ष अशी एकुण रक्कम रू.२४.८० लक्ष खर्च भागविणेस मंजूरी आहे. या कामाच्या निविदा ई-टेंडरींग विभागामार्फत मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सय्यद समीउद्यीन रझवी | अं.प.दरापेक्षा १४.९९% कमी |
| २. | चांदराम आशन्ना | अं.प.दरापेक्षा १४.९९% कमी |
| ३. | तुषार कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १४.२०% कमी |
| ४. | शेख मो. इब्राहिम | अं.प.दरापेक्षा ११.२०% कमी |
| ५. | सय्यद नासेर मुजफ्फर | अं.प.दरापेक्षा ०९.००% कमी |
| ६. | रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ०९.००% जास्त |

उपरोक्त पैकी अ.क्र. १ व २ चे निविदाधारक यांचे समान दर असल्यामुळे त्यांचेकडून सिलंबद लिफाफ्यात पुनःश्च सुधारीतऑफर घेण्यात आली असता सुधारीत देकारांचा तपशील खालील प्रमाणे.

१. सय्यद समीउद्यीन रझवी     १५% कमी दराने

२. चांदराम आशन्ना     १४.९९% कमी दराने

वरील पैकी सर्वात कमी दर श्री.समीउद्यीन रझवी यांचे असल्यामुळे त्यास मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१७, एन-९, सिडको, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौ. सोसा., उल्का हौ. सोसा., चंद्रनगर हौ.सोसा. येथील नाल्यास संरक्षीत भिंत बांधून नाला चॅनलींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.समीउद्यीन रझवी यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५ :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी प्रभाग क्र.१ ते ६ साठी ई-टेंडर द्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदा दिनांक २८-९-२००७ रोजी उघडण्यात आल्या होत्या व मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार १ जुन २००८ ते ३० जुन २००८ या एक महिन्याच्या कलावधीकरीता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना मुदतवाढ देण्यात आली होती.

| प्रभाग क्रमांक | कंत्राटदाराचे नांव | प्रभागाची किंमत रूपये | लावलेली बोली रूपये | एकूण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | भारत पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| २. | सचिन पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ३. | आर.डी. पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ४. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ५. | निलेश पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ६. | ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार संस्था | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| | एकूण - | | | **६,०३,१३२/- प्रति माह** |

**(तीन महिन्याची एकूण रक्कम रू.१८,०९,३९६/-)**

वरील कंत्राटदारांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३० जुन २००८ रोजी संपलेली आहे. परंतु नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता, पुर्वीच्याच दराप्रमाणे वरील कंत्राटदारांमार्फत सदरील काम करून घेण्यासाठी १ जुलै २००८ ते ३० सप्टेंबर २००८ या तीन महिन्यांची मुदतवाढीची कार्योत्तर मंजुरी घेण्यासाठी स्थायी समिती सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी प्रभाग क्र.१ ते ६ साठी नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता, पुर्वीच्याच दराप्रमाणे वरील कंत्राटदारांमार्फत सदरील काम करून घेण्यासाठी १ जुलै २००८ ते ३० सप्टेंबर २००८ या तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या ४० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात रेल्वेस्टेशन कॉर्नर ते हॉटेल प्रशांत या रस्त्यावर रूंदीकरण व खडीकरण करणे या कामाकरीता सा.बां. खात्याचे सन २००७-२००८ च्या दरसुची प्रमाणे रक्कम रू.१२,२१,७५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील खर्च सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.१२,२१,७५४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या ४० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात रेल्वेस्टेशन कॉर्नर ते हॉटेल प्रशांत या रस्त्यावर रूंदीकरण व खडीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. १२,२१,७५४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जवाहरनगर पोलीस स्टेशन १२ मीटर रूंद विकास योजना रस्त्यावरील अतिक्रमण काढलेल्या जागेवर खडी रस्ता तयार करणे या कामाकरीता सा.बां. खात्याचे सन २००७-२००८ च्या दरसुची प्रमाणे रक्कम रू.११,४९,७१६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील खर्च सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.११,४९,७१६/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहरनगर पोलीस स्टेशन १२ मीटर रूंद विकास योजना रस्त्यावरील अतिक्रमण काढलेल्या जागेवर खडी रस्ता तयार करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,४९,७१६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रभाग क्र. १ ते १० करिता मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार ३० जून २००८ पर्यंत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. या कालावधीकरीता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आलेले होते.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदारांना द्यावयाची एकूण रक्कम प्रतिमाह |
|---|---|---|
| १. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **२,१६,८५२.००** |
| २. | जे. एच. मिर्झा | **२,१३,८५६.००** |
| ३. | अनिकेत कन्स्ट्रक्शन | **२,५४,५३५.००** |
| ४. | परफेक्ट हाऊस किपींग | **२,४४,३५२.००** |
| ५. | व्ही. जी. स्वामी | **२,२६,८७४.००** |
| ६. | निलेश लेबर सप्लायर्स | **१,६८,७३८.००** |

| | | |
|---|---|---|
| ७. | निलेश लेबर सप्लायर्स | **१,५८,८९७.००** |
| ८. | ईश्वरलाल खरे | **१,८२,१९७.००** |
| ९. | के. एम. सुरे | **१,९९,८०८.००** |
| १०. | निलेश लेबर सप्लायर्स | **२,०५,०१४.००** |

वरील कंत्राटदारांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३०.६.२००८ रोजी संपलेली आहे. नविन निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. स्वच्छतेचा संबंध आरोग्याशी असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराचे काम चालु ठेवण्यात आलेले आहे. साफसफाईचे निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत माहे जुलै २००८ व ऑगस्ट २००८ या कालावधीसाठी कामास मंजुरीस्तव व निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कार्यादेश देण्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.मोहन मेघावाले : वॉर्ड-ब भागातील एजन्सी साफसफाईचे काम व्यवस्थीतरित्या करीत नाही म्हणून वेळोवेळी सिडको, हडकोतील नगरसेवकांनी तक्रार केली आहे. साफसफाई करणारे मजुरांचे पगार कोण अदा करतो, जे मजुर आहेत त्यांना तिन तिन महिण्यांपासून पगार देण्यात आलेले नाही त्या कारणाने ते काम करत नाही व त्या कारणाने स्वच्छता होत नाही. त्यामुळे सध्या हा प्रस्ताव स्थगीत ठेवून प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. प्रभाग समिती सभेतही तक्रार आहे.

श्री.रविकांत गवळी : सिडको हडको हस्तांतरणापूर्वी त्या भागात व्यवस्थित स्वच्छता होत होती मात्र मनपामध्ये हस्तांतरण झाल्यानंतर साफसफाई व्यवस्थीत होत नाही. खाजगी गुत्तेदारावर कुणाचेच नियंत्रण राहिलेले नाही. हजेरी पटावर जे मजूर दाखविण्यात आलेले आहे व प्रत्यक्षात काम करणारे मजूर यात तफावत आहे. वर्षानुवर्ष तोच गुत्तेदार असल्याने त्याचा मनमानी कारभार चालला आहे. सफाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी मा.आयुक्तांनी वॉर्ड अधिकाऱ्यांनी नियुक्ती केली होती. परंतु त्यांचे गुत्तेदार ऐकत नसल्याकारणाने कार्य.अभियंता, वै.अधिकारी, उपआयुक्त (महसूल), उपआयुक्त, (प्र) उपआयुक्त (सिडको) यांची वॉर्डचे प्रमुख म्हणून नेमणुक केली होती. या विभागप्रमुखांनी तपासणी केली का? साफसफाईचे जे लेबर आहेत ते किती प्रमाणात पाहिजे यावर कुणाचे नियंत्रण नाही. साफसफाई होत नसेल तर मनापाचा पैसा का खर्च करावयाचा. याचा खुलासा व्हावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: साफसफाईचे काम आहे ते झालेले आहे आणि ते बिल देणे क्रमप्राप्त आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या देखरेखखाली सदरचा वॉर्ड येतो त्यांच्याकडून सखोल चौकशी व्हावी. उपस्थित अधिकाऱ्यांकडून माहिती घेवून बिल मंजूर करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :प्रकरणाची चौकशी केल्यानंतर बिल अदा करण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे : वॉर्डात किती लेबर कार्यरत आहे रोज किती लेबर हजर राहतात किती गैरहजर राहतात याचा खुलासा वॉर्ड अधिकाऱ्यांना देतात त्यानंतर बिल तयार होते, याचा रिपोर्ट मागविण्यात येवून प्रकरणाचा खुलासा करण्यात यावा.

श्री.संजय जोशी : प्रत्येक वॉर्डात साफसफाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिऱ्यांची नियुक्ती केली होती. सिडको भागात कुठल्या अधिकाऱ्याकडे जबाबदारी होती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : संबंधीत अधिकारी असतील त्यांनी खुलासा करावा की साफसफाईचे काम व्यवस्थीत होते की नाही, याबाबत सर्टिफिकेट देण्यात यावे. किती लेबर हजर राहतात किती गैरहजर राहतात निश्चित केलेले लेबर संख्या आहे किंवा नाही. स्थायी समितीने गुत्तेदारांना ब्लॅक लिस्ट केलेले असेल आणि त्याचे पेमेंट आपण करत असेल तर ते स्थायी समितीच्या दृष्टीने योग्य वाटत नाही.

आरोग्य वै.अधिकारी : ब वॉर्डासाठी मागील वर्षी जे टेंडर काढण्यात आले होते त्याचे हे कॉन्ट्रक्टर आहेत. सिडकोमधे ३५० लेबर कार्यरत आहेत. दररोज जे लेबर हजर,गैरहजर असतात त्याचा दैनंदिन रेकॉर्ड वॉर्ड अधिकारी आणि स्वच्छता निरीक्षक यांचे मार्फत तपासणी होत आहे. सुपरव्हीजनसाठी मा.आयुक्तांनी वर्ग-१ अधिकाऱ्यांची नेमणुक केली आहे त्यांचे अहवाल प्राप्त झालेले आहेत. जेवढे लेबर गैरहजर असतात त्यांचे एक दिवसाचे पेमेंट कपात करून २०० रूपयांचे फाईन लावण्यात येते. ५-५ हजार फाईन केले. प्रत्येक गुत्तेदारांला फाईन केला जातो. साफसफाईचे काम समाधानकारक नसल्यास प्रत्येक वेळी पाच हजार रूपयांचे फाईन केलेले आहे. काम समाधानकारक नाही. नविन टेंडर काढण्यात आलेले आहे आणि ते अंतिम टप्प्यात आहे.

श्री.सतिष कटकटे : फाईन केल्यानंतर शहराची स्वच्छता झाली आहे काय? लेबर गैरहजर असतांना दुसऱ्या लेबरकडून साफसफाईचे काम करून घेण्यात आले काय. जर गैरहजर लेबरच्या जागी दुसरा लेबर लावला असतातर साफसफाईचे काम चांगले झाले असते. काम समाधानकारक नसतांना बिल कसे देता.

आरोग्य वै.अधिकारी : लोकल लेवलच्या ठिकाणी लेबर लावण्यात येते.

श्री.नारायण कुचे : ३० जुलैच्या बैठकीत काळ्या यादीत टाका म्हणून बोललो होतो. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी काम समाधानकारक नाही असे म्हटलेले आहे. तरी पेमेंट देण्यास सांगतात.

श्री.रविकांत गवळी : सिडकोसाठी ३५० लेबरवर साधारणतः २१ लाख रूपये खर्च होतात. गुत्तेदारांना वॉर्ड विभागून देण्यात आलेले आहे. ते गुत्तेदार त्या विभागात लेबर लावून काम करून घेतात का? फाईन लावला याचा अर्थ तो व्यवस्थितरीत्या काम करत नाही. ९०% ओ.के. काम करीत नाही. गुत्तेदार हे राजकीय पक्षाशी संबधीत असल्याकारणाने त्यांच्यावर नियंत्रण राहत नाही. वॉर्ड ब मधे साफसफईवर नियंत्रणासाठी एका अधिकाऱ्याची नेमणुक केली होती त्यांचा अभिप्राय घ्यावा. वॉर्ड ब च्या मा.सभापती सौ.रजनी जोशी यांनी गणपती उत्सव सुरू होण्याच्या पुर्वी वॉर्डात साफसफाईच्या संदर्भात एक बैठक लावण्यात आली होती. त्या बैठकीत आरोग्य अधिकारी, उपआयुक्त (प्र), वॉर्ड अधिकारी, व गुत्तेदार हजर होते. परंतु बैठक चालू असतांना गुत्तेदार बैठक सोडून गेले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :३५० लेबर ची यादी वै.अधिकाऱ्यांनी आमच्याकडे देण्यात यावी जेणे करून आम्ही पोलिस कडून त्याची शहानिशा करून घेवू. कायद्याच्या कचाट्यात टाका. पोलीस केस करा. लेबरची नांवे द्यावी.

श्री.मोहन मेघावाले : सदरील गुत्तेदाराला ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. ९०% काम करीत नाही. राजकीय पुढाऱ्यांबरोबर संबंध आहेत.

आरोग्य वै.अधिकारी : मोना लेबर या गुत्तेदाराचे वॉर्ड ड मधे ब्लॅक लिस्ट केलेले आहे.

श्री.संजय जोशी :निलेश लेबर सप्लायर्स चे प्रोपरायटर कोण, पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल यांनी कुठल्या भागात काम केल. किती लेबर होते आणि कधी काम केले. रजिष्ट्रेशन व्हॅलिड आहे काय नाही याबाबत दहा कंत्राटदारांचा चार्ट आठ दिवसात तयार करून स्थायी समितीकडे देण्यात यावा. जेणे करून स्थानिक नगरसेवकांना यादी देता येईल व सदरील कंत्राटदारांची चौकशी करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेची आर्थीक स्थिती लक्षात घेता कुठलेही विकास काम हाती घेता येणार नाही हे मान्य आहे परंतु सध्या धार्मीक सण आलेले आहेत. साफसफाईचे काम चांगले होणे आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. गणपती उत्सवात वार्ड-ब च्या मा.सभापती सौ.रजनी जोशी यांनी साफसफाई संदर्भात जी बैठक बोलविली होती त्यात वॉर्ड अधिकारी आणि कंत्राटदार निघुन गेले होते याचा खुलासा अद्याप पर्यंत झालेला नाही.

मा.सभापती : वॉर्ड अधिकारी निघुन गेले होते काय?

आरोग्य वै.अधिकारी : वॉर्ड अधिकारी निघुन गेले होते.

श्री.सिताराम सुरे : सफाईबाबत चर्चा चालू असतांना वॉर्ड अधिकारी व आरोग्य वै.अधिकारी यांचे शाब्दीक चकमक झाल्यामुळे वॉर्ड अधिकारी बैठक सोडून गेले. त्यामुळ मा.सभापती यांचा अपमान झालेला आहे. तसेच वॉर्ड अधिकारी यांनी सांगीतले की मला इथे काम करण्याची इच्छा नाही असे मत व्यक्त केले होते.

श्री.रविकांत गवळी : वॉर्ड अधिकाऱ्यांची मानसिकता का झाली असेल याचा विचार व्हायला हवा. सफाई कंत्राटदार वॉर्ड अधिकाऱ्याच ऐकतच नसल्या कारणाने इतर नगरसेवकांचे बोलणे खावे लागतात. याबाबत वारंवार तोंडी सुचना उपआयुक्त (प्र), आरोग्य अधिकारी यांना दिलेली आहे.

आरोग्य वै.अधिकारी : वॉर्ड-ब चे वॉर्ड अधिकारी यांनी सदरच्या कंत्राटदाराचे काम समाधानकारक असल्याचा अहवाल दिला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकरः प्रश्न वॉर्ड ऑफीसरचा नसून सिस्टीमचा हा प्रश्न आहे, दहा दहा वर्षापासून सदर कंत्राटदारांना काम दिलेले आहे त्यामुळे त्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. व तो कुणाचेच ऐकत नाही. जे चांगले काम करतो, रागात जातो. श्री.सुर्यवंशी यांना ताकीद देण्यात यावी. प्रकरण बंद करावे.

श्री.सतिष कटकटे :जवानांच्या रिपोर्टनुसार बिल तयार झाले आहे काय?

श्री.संजय जाशी : जवानांचा रिपोर्टही मागविण्यात यावा.

मा.सभापती : विषय क्र ९८ मधे सिडको भागातील सर्व नगरसेवकांनी साफसफाईबाबत वारंवार तक्रार केलेली आहे. त्यामुळे चौकशी पुर्ण हाईपर्यंत बिले थांबविण्यात यावी.

श्री.वसंत नरवडे : पेमेंट थांबविल्यावर साफसफाईचे काम थांबणार नाही याकडे लक्ष दया व पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. नाही तर जे काही १० टक्के काम चालू आहे तेही थांबले जाईल.

मा.सभापती : मनपाच्या करारनाम्यात लिहिलेले आहे की, मनपाने पेमेंट दिले नाही तरी ३ महिणे कंत्राटदारांनी पेमेंट करावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ५०% आता द्यावे, राहिलेले पेमेंट चौकशी नंतर द्यावे.

श्री.अ.रशिद मामू : तिन चार सदस्यांची कमिटी बनून चौकशी करून त्यांचा अहवाल तयार करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : मागील स्थायी समितीच्या बैठक चालू असतांना एक पत्र आले होते की,विभागीय आयुक्तालयात घनकचऱ्यासंदर्भात मिटींग झाली आणि मिटींगमधे हैद्राबाद येथील रामको एजन्सीला घनकचरा हाताळण्यासाठी कंत्राट दिला म्हणून समजले आहे. मागे आपण तो रद्द केला होता की मनपाची आर्थीक स्थिती बरोबर नाही म्हणून. दोन महिण्यांनंतर मनपाची आर्थीक स्थिती सुधारली आहे काय? की त्याच एजन्सीला पुन्हा कंत्राट दिले.

श्री.अ.रशिद मामू : मा.आयुक्तांना आपला निर्णय ३ महिण्यांत बदलावा लागला तर मा.आयुक्तांवर वरचा दबाव आला होता काय?

श्री.सिताराम सुरे : आपण मागील बैठकीत अशी रूलींग दिली होती की रिटेंडरींग करण्यात यावे. त्याचे काय झाले.

श्री.संजय जोशी : प्रीबीड नंतर चार कंत्राटदारांचे ७ चे १० वर्ष करावयाचे, म्हणजे प्रीबीड निगोशिएशन बंद खोलीत झाले आहे म्हणून ७ चे १० वर्ष केले. महानगरपालिकेच्या बसेस १० वर्षांनी घेणार व ह्या गाड्या परत करणार. आर्थीक स्थिती बरोबर नाही म्हणून मा.आयुक्तांनी शासनाला कळविले होते, काल परवा आपणाकडूनच कळाले की, मंजूर झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहे. व आता आम्हाला सांगतात कि, १० लाख रूपये तुमच्या वॉर्डात विकासाठी आहे. आणि ९० लाख रूपये त्या एजन्सीला देणार आहे. २५ कि.मी.अंतरावर कचरा टाकण्यासाठी आपण त्या एजन्सीला पैसे देणार आहेत. आज ती एजन्सी ८ कि.मी.अंतरावर कचरा टाकणार आहे. रोज त्या एजन्सीचे १० ते १५ कि.मी.चे एका गाडीचे पैसे वाचणार आहे. असा किती फायदा होणार आहे त्या एजन्सीला. तर आमची आर्थीक परिस्थिती केव्हा सुधारली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: स्थायी समितीने प्रस्ताव रद्द केल्यानंतर असा सरकारने कुणाला अधिकार दिला आहे परत त्याच एजन्सीला द्यावा. दुसर म्हणजे मा.आयुक्तांनी सांगीतल की फिजेबल नाही तर फिजेबर होण्यासाठी असा कोणता कायदा आहे. एकदा प्रस्ताव रद्द केल्यानंतर तो परत आणण्यासाठी पुन्हा नविन पध्दतीने सर्व प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : खुलासा करण्यात यावा की हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर येणार नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: स्थायी समितीने या पुर्वीचा घेतलेला ठराव आहे त्या ठरावाच्या अनुषंगाने जो केलेला करार आहे तो योग्य आहे काय? स्थायी समितीच्या ठरावाला डावलण्याचा अधिकारी कुणाला आहे.

मा.सभापती : सदरचा विषय आल्यावर बघू.

श्री.रविकांत गवळी : १ ऑक्टोबर पासून आपण नव्याने प्रक्रिया करणार आहे. १ ऑक्टोबर पासून नव्याने निवीदा करणार आहे काय?

श्री.वसंत नरवडे पा. : ०१ तारखेपासून काम करणार.

मा.सभापती : सिडको भागातील सर्वच नगरसेवकांनी साफसफाई बाबत स्थायी समितीसमोर वारंवार गुत्तेदारांविरूध्द तक्रार केलेली आहे. अशी तक्रार सर्वसाधारण सभेत सुध्दा झालेली आहे. आरोग्य अधिकारी आणि सर्वांचेच असे मत आहे की, काम

समाधानकारक नाही. त्यांना बिल देण्यासंदर्भात प्रस्ताव आलेला आहे. उपआयुक्त (प्र) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या समितीत स.स.श्री.रविकांत गवळी, श्री.सतिष कटकटे, श्री.सिताराम सुरे, श्री.मोहन मेघावाले, श्री.संजय जोशी, तिन दिवसात अहवाल दयावा.

श्री.रविकांत गवळी : स.स.श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर किंवा श्री.अ.रशिद मामू यांना हया कमिटीमधे समाविष्ट करण्यात यावे.

श्री. कचरू मोरे : स.स.श्री.नरवडे यांनी खंत व्यक्त केली आहे की, सदर कंत्राटदाराचे बील दिले गेले नाही तर उद्या काम बंद करतील माझे असे म्हणणे आहे की ॲग्रीमेंट प्रमाणे मागचे पैसे मिळू शकत नाही, त्याला काम सुरू ठेवावेच लागेल. प्रत्येक लेबरकडुन रू.१०००/- घेवून त्याला कामावर घेण्यात आलेले आहे. कंत्राटदाराचे लाड करण्याची काहीच गरज नाही.

श्री.रविकांत गवळी : सफाई कामगारांकडून काम घेण्यात आलेले असेल तर त्यांचे पेमेंट थांबवता येणार नाही. संबंधीत सफाईचे काम करणारे गुत्तेदारांचे नफा (Margin Money) ची रक्कम थांबवून सफाई कामगारांचे होणारे वेतनाची रक्कम देण्यात यावी. तीन महिन्यापासून पेमेंट दिलेले नाही. सणासुदीचे दिवस असल्याने लेबर पेमेंट देण्यात यावे.

मा.सभापती : प्रभाग समिती-ब चे स.सभापती सौ.रजनी जोशी, उप आयुक्त(प्र) हजर होते. या बैठकीतून वॉर्ड अधिकारी निघून गेले. विषय क्र.९८ साफसफाई बद्दल आहे. साफसफाईची कामे प्रथम व्हावे. या विषयाची गंभीरता पाहून, मनपाचे उपआयुक्त (प्र) यांच्या अध्यक्षतेखाली स.स.रशिद मामू, स.स.श्री.रविकांत गवळी, श्री.सतिष कटकटे, श्री.सिताराम सुरे, श्री.मोहन मेघावाले, श्री.संजय जोशी, श्रीमती जयश्री किवळेकर व स.स.नारायण कुचे हे सदस्य असतील या प्रकरणाची ७ दिवसात संपूर्ण चौकशी करून स्थायी समिती सभापतींकडे अहवाल देतील व यावर सभापती व उप आयुक्त(प्र) निर्णय घेतील.

चौकशी अहवालावरील निर्णयाचे अधीन राहून साफसफाईचे काम करणारे संबंधीत गुत्तेदारांचे नफा (Margin Money) ची रक्कम थांबवून सफाई कामगारांचे होणारे वेतनाची रक्कम देण्यात यावी. चौकशी अहवालावरील निर्णयानंतर अंतिम बील देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रभाग क्र. १ ते १० करिता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना साफसफाईचे निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत माहे जुलै २००८ व ऑगस्ट २००८ या कालावधीसाठी कामास मंजुरी देण्यात येते व निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कार्यादेश देण्यास मंजुरी देण्यात येते.

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या विषयाची गंभीरता पाहून, मनपाचे उपआयुक्त (प्र) यांच्या अध्यक्षतेखाली स.स.रशिद मामू, स.स.श्री.रविकांत गवळी, श्री.सतिष कटकटे, श्री.सिताराम सुरे, श्री.मोहन मेघावाले, श्री.संजय जोशी, श्रीमती जयश्री किवळेकर व स.स.नारायण कुचे हे सदस्य असतील. या प्रकरणाची ७ दिवसात संपूर्ण चौकशी करून स्थायी समिती सभापतींकडे अहवाल देतील व यावर सभापती व उप आयुक्त(प्र) निर्णय घेतील. चौकशी अहवालावरील निर्णयाचे अधीन राहून साफसफाईचे काम करणारे संबंधीत गुत्तेदारांचे नफा (Margin Money) ची रक्कम थांबवून

सफाई कामगारांचे होणारे वेतनाची रक्कम देण्यात यावी. चौकशी अहवालावरील निर्णयानंतर अंतिम बील देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव |
|---|---|
| १. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल |
| २. | जे. एच. मिर्झा |
| ३. | अनिकेत कन्स्ट्रक्शन |
| ४. | परफेक्ट हाऊस किपींग |
| ५. | व्ही. जी. स्वामी |
| ६. | निलेश लेबर सप्लायर्स |
| ७. | निलेश लेबर सप्लायर्स |
| ८. | ईश्वरलाल खरे |
| ९. | के. एम. सुरे |
| १०. | निलेश लेबर सप्लायर्स |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येत आहेत.

श्री.अ.रशीद खान मामू: श्री.खान यांचे एक अपील आहे. वेतनवाढ थांबविलेली आहे. ते अपील मंजूर करावे.

मा.सभापती : श्री. खान यांचे एक अपील आहे. दोन इंक्रीमेंट बंद केले आहे. ते पुढील महिण्यात सेवानिवृत्त होत आहेत. अपील मंजूर करण्यात येत आहे.

श्री.वसंत नरवडे : प्रत्येक कर्मचाऱ्यासोबत समान न्याय करावा. एकाला एक न्याय व दुसऱ्याला दुसरा न्याय देण्यात येवू नये.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. ९९ :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, इमारती व उद्याने) विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६४ अंतर्गत मो. सावरकर चौक झांबड इस्टेट परिसरातील नाला चॅनलींग करणे, या कामाचे मुळ मंजूर अंदाजपत्रक रक्कम रू.८.०० लक्ष चे असून रितसर निविदा प्रक्रिया पूर्ण करून मुळ निविदेतील काम सर्वात कमी दराचे निविदाकार कंत्राटदार श्री.एस.एम.इब्राहीम यांचेकडून (निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने) करून घेण्यात आले आहे. मा.महापौर व इतर मान्यवरांनी या स्थळाची काम चालू असतांना प्रत्यक्ष पाहणी करून झांबड इस्टेट परिसरातील नाला भागाच्या पूर्ण लांबीस नाला चॅनलिंगचे काम चालू असलेल्या कंत्राटदाराकडून तातडीने करून घेणे बाबत दि.२७/२/२००८ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. तसेच वाढीव कामा करीता लागणारी रक्कम रू.८.०० लक्षची तरतूद मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.८७ दि.३१.१.२००८ अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१६.०० लक्ष चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सुधारीत आंजपत्रक रू.१६.०० लक्ष मान्यतेस्तव आणि वाढीव ८.०० लक्ष चे काम मुळ मंजूर कंत्राटदार श्री. एस.एम.इब्राहीम यांचेकडून बी-१ निविदा अटी शर्ती प्रमाणे मुळ निविदा परिशिष्ट-ब मधील बाबी १२५% पर्यंतच्या परिमाणाचे मंजूर निविदा दराप्रमाणे आणि १२५% पेक्षा

जास्त वाढीव परिमाणाच्या बाबीस चालू दर सुची सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकीय दराने काम करून घेणेचा प्रस्ताव मंजूरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६४ अंतर्गत मो. सावरकर चौक झांबड इस्टेट परिसरातील नाला चॅनलींग करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेले सुधारीत रक्कम रू.१६.०० लक्ष चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच वाढीव ८.०० लक्ष चे काम मुळ मंजूर कंत्राटदार श्री.एस.एम.इब्राहीम यांचेकडून बी-१ निविदा अटी शर्ती प्रमाणे मुळ निविदा परिशिष्ट-ब मधील बाबी १२५% पर्यंतच्या परिमाणाचे मंजूर निविदा दराप्रमाणे आणि १२५% पेक्षा जास्त वाढीव परिमाणाच्या बाबीस चालू दर सुची सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकीय दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा चौक ते तारा पान सेंटर रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,७०,९२६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार कोरी निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी चार निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| ०१. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. | अं.प.दरापेक्षा ०.५% कमी दराने |
| ०२. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ४.४१% कमी दराने |
| ०३. | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा ४.९७% कमी दराने |
| ०४. | श्री.के.बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा १७.२१% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी आहेत.

तरी मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा चौक ते तारा पान सेंटर रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक यांनी दिलेल्या दरानुसार सदर काम मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गुरूता गद्दी सन २००८ साठी सिंधी कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००७-०८ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१२,४७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात आलेला आहे. सदरील कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षाअंतर्गत गुरूता गद्दी सन २००८-०९ च्या आर्थिक तरतुदी अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २१% कमी दराने |
| ०२. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | अं.प.दरापेक्षा २०.८६% कमी दराने |
| ०३. | काझी मुबारीजोद्यीन बशीरउद्यीन | अं.प.दरापेक्षा ११.९९% कमी दराने |
| ०४. | काझी म. फारूख म. इस्माईल | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची निविदा ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

दरम्यान सदर कामामध्ये साधे पेव्हर ऐवजी ईटालीयन पेव्हर ब्लॉक वापरण्याची मागणी स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, तरविंदरसिंग धिल्लन, सुरजितसिंग सबरवाल व इतर यांनी केलेली आहे. गुरूता गद्दी हा कार्यक्रम जागतिक स्तरावर होत असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक येणार आहेत. साधे पेव्हरब्लॉक सध्या एवढ्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत व काम तातडीने करणे गरजेचे असल्याने, तसेच इटालीयन पेव्हर ब्लॉक सध्या सहज उपलब्ध असल्याने काम तातडीने पूर्ण करता येईल. मात्र इटालीयन पेव्हर ब्लॉकचे काम करावयाचे झाल्यास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६.७७ लक्ष होत आहे. निविदा दर २१% कमी दरामुळे होणाऱ्या बचतीमुळे या कामासाठी एकूण रक्कम रू.१३.२५ लक्ष इतका प्रत्यक्षात खर्च येणार आहे. त्यामुळे २१% कमी दरामुळे बचत वजा जाता प्रत्यक्षात अंदाजपत्रकापेक्षा ७८ हजार इतका वाढीव खर्च येणार आहे. मंजूर निविदा दर २१% कमी दराने करून घेण्यास मान्यता द्यावी.

त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकास व सदरचे काम ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराने करून घेण्यास प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरूता गद्दी सन २००८ साठी सिंधी कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणेचे काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामुळे, स.सदस्यांचे सुचनेनुसार, त्याचप्रमाणे साध्या पेव्हर ब्लॉकची अनुपलब्धता विचारात घेता साधे पेव्हर ऐवजी ईटालीयन पेव्हर ब्लॉक बसविण्यास व या कामासाठी रक्कम रू.१६.७७ लक्ष च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि सदरचे काम मंजूर निविदा दर २१% कमी दराने ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत करून घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समिती सभा दिनांक ७/११/२००६ ठराव क्रमांक १५५ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यरत वाहन भत्त्यामध्ये वाढ करणेसाठीचा प्रस्ताव सादर करीत आहे. वारंवार होणाऱ्या इंधन खर्चातील वाढ, पेट्रोल दरातील वाढीमुळे सर्व संबंधीतांना वाहन भत्त्यामध्ये वाढ व्हावी म्हणून सहायक अभयंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रतिमाह रू.५००/- ऐवजी **रू.८००/- वाहन भत्ता** देण्यास मंजुरी देण्यात आलेली असून त्यानुसार कार्यालयाने दि.२८/११/२००६ पासून संबंधीत कर्मचाऱ्यांना वाढीव भत्ता देण्यास मंजुरी दिलेली आहे.

परंतु वरील दुय्यम आवेक्षक पदाच्या समकक्ष असलेले **विद्युत पर्यवेक्षक** या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना देखील दि.२८/११/२००६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने वाहन भत्ता प्रतिमाह रू.८००/- लागू करण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक : रविकांत गवळी**

**अनुमोदक : दत्ताभाऊ पाथ्रीकर, सतीश कटकटे**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्रमांक १५५, दिनांक ७/११/२००६ अन्वये इंधन खर्चातील वाढ, पेट्रोल दरातील वाढीमुळे सर्व संबंधीतांना वाहन भत्त्यामध्ये वाढ व्हावी म्हणून ज्याप्रमाणे सहायक अभयंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रतिमाह रू.५००/- ऐवजी रू.८००/- वाहन भत्ता देण्यास मंजुरी देण्यात आली त्याप्रमाणे दुय्यम आवेक्षक पदाच्या समकक्ष असलेले **विद्युत पर्यवेक्षक** या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना देखील दि.२८/११/२००६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने वाहन भत्ता प्रतिमाह रू.८००/- लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात असणारे सार्वजनिक स्वच्छतागृह/शौचालये स्थानिकांना चालविण्यासाठी दिल्यास त्यांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. परंतु असे निदर्शनास आले आहे की, महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्याबाहेरील व्यक्तींना/संस्थांना शौचालये चालविण्यास दिलेले आहेत. त्यामुळे स्थानिकांच्या हक्कावर गदा येत आहे. महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य स्थानिकांना प्राधान्य देणे हे असते. औरंगपुरा व घाटी दवाखाना या दोन ठिकाणी असलेल्या स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत वाईट आहे. संबंधीत ठेकेदार संस्था/व्यक्ती या ठिकाणी साफसफाई नीटपणे ठेवत नसल्याबाबत त्यांच्या अनेक तक्रारी प्राप्त आहेत.

त्यामुळे सदर शौचालयांचा बाहेरील व्यक्ती अथवा संस्थांना दिलेला ठेका रद्द करण्यात यावा आणि औरंगपुरा व घाटी दवाखाना त्याचप्रमाणे शहरात तयार होत असलेल्या इतर ठिकाणचे शौचालये/स्वच्छता गृहाचे बाबतीत देखील विचार करून स्थानिक नागरीकांना, बेरोजगार तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी शौचालये/स्वच्छता गृह चालविण्यासाठी देण्यात यावेत.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - **दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर**

अनुमोदक - **जावेद हसन खान**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील शौचालये/स्वच्छतागृह साफसफाईचे काम करणारे ठेकेदार संस्था/व्यक्ती या ठिकाणी साफसफाई नीटपणे ठेवत नसल्याबाबत त्यांच्या अनेक तक्रारी असल्याने तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्याचे दृष्टीने औरंगाबाद शहरात असणारे सार्वजनिक स्वच्छतागृह/शौचालयांचा बाहेरील व्यक्ती अथवा संस्थांना दिलेला ठेका रद्द करण्यात यावा आणि औरंगपुरा व घाटी दवाखाना त्याचप्रमाणे शहरात तयार होत असलेल्या इतर ठिकाणचे शौचालये/स्वच्छता गृहाचे बाबतीत देखील विचार करून स्थानिक नागरीकांना, बेरोजगार तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी शौचालये/स्वच्छता गृह चालविण्यासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४ :**

कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/२०६ दि.९/६/२००७ अन्वये कायमस्वरूपी थांबविण्यात आलेल्या दोन देय वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करणे व निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणून गृहीत धरण्यात यावा, यासंबंधीचे श्री.अब्दुल रहेमान खान मोहंमद खान, वरीष्ठ लिपिक, अभिलेख विभाग, महानगरपालिका औरंगाबाद(तत्कालीन कर निरीक्षक, वॉर्ड-क कार्यालय) यांचे अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा. सभापती : श्री.ए.आर.खान (व.लि.), अभिलेख विभाग यांनी सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.अब्दुल रहेमान खान मोहंमद खान, वरीष्ठ लिपिक, अभिलेख विभाग, महानगरपालिका औरंगाबाद(तत्कालीन कर निरीक्षक, वॉर्ड-क कार्यालय) यांचे अपील मंजुर करण्यात येते. त्यानुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/२०६ दि.९/६/२००७ अन्वये कायमस्वरूपी थांबविण्यात आलेल्या दोन देय वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करणेस व निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणून गृहीत धरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :झाल्टा प्रकल्प चौकशीचा अहवाल आला आहे काय?

मुख्य लेखा परिक्षक :त्या दरम्यान अनेक प्रकरणांची चौकशी माझेकडे दिली आहे. मालमत्ता कर मागणी निश्चिती करण्यासाठी चौकशी माझ्याक्डे असल्याने व स्पेकची चौकशी अंतिम टप्प्यात आहे ते झाल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

मा.सभापती :लवकारात लवकर अहवाल देण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे :२ डिसेंबर २००७ रोजी माझ्यावर आरोप लावून २० दिवस जेलमधे पाठविण्यात आले होते. जालना रोडवर अवैध मटन विक्री चालू आहे त्या संदर्भात पशुसंवर्धन अधिकारी यांचेशी संपर्क साधला परंतु अजून पर्यंत अवैध मटन विक्री चालू आहे. ते केव्हा बंद होणार आहे.

पशुसंवर्धन अधिकारी : स.सदस्यांनी अनेक वेळा माझ्याकडे तक्रार दिली आहे ५८ अवैध मटन विक्री करणाऱ्यांना नोटीस दिली आहे. त्याबाबतीत पोलीस स्टेशनमधे यादी पाठविली आहे. आपल्या कर्मचाऱ्यांसोबत पुर्वी पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक जात होते, परंतु पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक काढण्यात आलेले आहे. त्या कारणाने कर्मचाऱ्यांना ते जुमानत नाही.

मा.सभापती : ज्या कारणामुळे स.सदस्यांना २० दिवस जेलमधे काढावे लागले आणि प्रशासन सुरक्षा रक्षक नाही व इतर कारणे दाखवून कारवाईमधे दिरंगाई करत आहे.

श्री.वसंत नरवडे : हर्सुल टि पॉइंट येथील अवैध मटन विक्री करणाऱ्यांवर पोलीस स्टेशनमधे गुन्हा का दाखल करण्यात आलेला नाही.

मा.सभापती : आपण या विषयाला गंभीररितीने घ्या.

श्री.संजय जोशी : कायद्यात अशी तरतुद आहे की, ज्या ठिकाणी जनावरे क ापू नये असे असतांना जनावरे कापले जातात. अशा वेळी आपण पोलीस स्टेशनमधे गुन्हा नोंदविला पाहिजे.

पशुसंवर्धन अधिकारी : आम्ही त्या ठिकाणी कारवाई करण्यास गेलो असता जमावाद्वारे आमच्यावर हल्ले केले जातात. पोलीस बंदोबसत मिळाल्यावर कार्यवाही करू. एक स्वच्छता निरीक्षक निलंबीत आहे. २ वॉर्डात १ याप्रमाणे ३ स्वच्छता निरीक्षकांची आवश्यकता आहे.

श्री.वसंत नरवडे :अवैध विक्री करणाऱ्यांवर कारवाईसाठी व्हिडीओ शुटिंग, कॅमेरा हया साधनांचा वापर केला पाहिजे.

मा.सभापती : ५८ अवैध मटन विक्री करणाऱ्यांना नोटीस दिली आहे त्याचे प्रति आमच्याकडे देण्यात यावे. आम्ही सी.पीची भेट घेवून याबाबतीत त्यांच्याकडे तक्रार देण्यात येवू.

श्री.संजय जोशी : मनपा आयुक्तांनाही एक पत्र देण्यात यावे, मा.आयुक्त व आपण सी.पी.ची भेट घेवून त्यांच्यासमोर प्रश्न मांडू अवैध कत्तल होवू नये म्हणून एक पोलीस पथक मागवू.

पशुसंवर्धन अधिकारी :मा.आयुक्तांना दोन पत्र देण्यात आली आहे व पोलीस पथकाची मागणीही केलेली आहे.

श्री.सिताराम सुरे :हडको येथे लिगली मटन विक्री केंद्रसाठी दुकाने बांधण्यात आले आहे. विषय गंभीर आहे. मला जेलमध्ये जाण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घ्यावी.

मा.सभापती : आपण सी.पींची समक्ष भेट घेवू.

"राष्ट्रगिता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद